# बृहन्मुंबई महानगरपालिका

## सार्वजनिक आरोग्य खाते

## जाहिरात

सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत **हिंदुह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे पॉलिक्लिनिक व डायग्नॉस्टिक केंद्र तसेच हिंदुह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना** येथे बहुउद्देशीय कामगार यांची प्रथम सहा महिन्यांसाठी निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर नियुक्ती करण्याकरिता अति.आयुक्त महानगरपालिका यांची क्र.अति.आयुक्त.(प.उ)/डी/1274/17.08.2023 अन्वये मंजुरी प्राप्त झाली आहे. त्याकरीता खालील पद कंत्राटी तत्वावर भरण्याकरीता दि. 13.10.2023 ते 14.10.2023 या कालावधीत सकाळी 11:00 ते संध्याकाळी 6:00 वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहे. सदर अर्ज खालील लिंक व्दारे स्वीकारले जातील.

**अर्ज भरण्याचे ठिकाण :** इच्छुक उमेदावारांने आवश्यक ते कागदपत्रांसह अर्ज ऑनलाईन, या लिंक वर https://forms.gle/w6mKDdypWNTdwpiA9 दि. 13.10.2023 ते 14.10.2023 या कालावधीत सकाळी 11:00 ते संध्याकाळी 6:00 वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने .

याची सविस्तर माहिती व अर्जाचा नमुना खालील प्रमाणे आहे :

**शैक्षणिक अर्हता :**

- 10 वी पास 100 गुणांच्या मराठी विषयासहित, एम.एस.सी.आय.टी (MS-CIT) उत्तीर्ण मुळ प्रमाणपत्रासहित

**वयोमर्यादा** : उमेदवाराचे वय दिनांक 01 ऑक्टोबर 2023 रोजी 45 वर्षापेक्षा अधिक असू नये.

**कामाचे स्वरुप :-**

1. दवाखाना उघडणे व बंद करणे
2. दवाखान्याच्या आतील स्वच्छता राखणे
3. सदर दवाखान्यात येणा-या रुग्णांना रांगेत बसविणे.
4. रुग्णांची नोंदणी टॅबव्दारे करणे
5. विभागीय वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून दवाखान्यासाठी लागणारी औषधे, साधन सामुग्री, वैद्यकीय साहित्य इत्यादी घेऊन येणे.
6. विभागीय वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी / विभागीय वैद्यकीय अधिकारी यांच्या कार्यालयात अहवाल घेऊन जाणे अथवा त्यांच्या कार्यालयातून परिपत्रक इत्यादी घेऊन येणे.
7. वैद्यकीय अधिका-यांना व परिचारीका (GNM) यांना मदत करणे.

**मानधन :-** या पदांसाठी मानधन Performance वर आधारित आहे.

- दरमहा किमान निश्चित मानधन रुपये 17,000/- (अक्षरी रुपये सतरा हजार मात्र).
- दर दिवशी रुग्णसंख्या 50 च्या वर गेल्यास प्रती रुग्ण रु.3/-(प्रती दिन रु.120/- पेक्षा जास्त नाही) याप्रमाणे अधिक मानधन दिले जाईल. जेणेकरुन जर दररोज 90 रुग्ण तपासल्यास मासिक मानधन अंदाजे रु.20,000 /- इतके होईल.
- एका महिन्यात 2,500 किंवा त्यापेक्षा अधिक रुग्ण तपासल्यास बहुउदेशीय कामगार यांना रु.1,000/- अतिरिक्त प्रोत्साहन मानधन देण्यात येईल.

  अर्जाचा नमुना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर (www.portal.mcgm.gov.in ) उपलब्ध होईल.

सही/-

**कार्यकारी आरोग्य अधिकारी**